
दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
VADAL VARTA
vadalvartanews@gmail.com
●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले ●कार्यकारी संपादक : संतोष निकम मो.न. ९४२२६६००७७
● बीड/महाराष्ट्र ● गुरुवार १८ एप्रिल २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक २४५ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

# शेतक-यांच्या प्रेतांवरून बनवा शक्ती पीठ महामार्ग




**वादळवार्ता**
मराठवाड्यात अगोदरच सिंचनाखाली जमीन कमी आहे. त्यातच पवणार ते पत्रादेवी शक्तिपीठ महामार्ग नांदेड, हिंगोली, परभणी, बीड, लातूर जिल्ह्यातून जात असून हा मार्ग अत्यंत सुपीक आणि बागायती जमिनीतून जाणार आहे. त्यामुळे कायमस्वरूपी शेतकरी भूमिहीन होणार आहेत. यामुळे पवणार ते पत्रादेवी या शीघ्र द्रुतगती शक्तिपीठ महामार्गास विरोध करण्यासाठी मराठवाड्यातील विविध जिल्ह्यातील बाधित शेतकरी प्रतिनिधीची बैठक शनिवार रोजी परळी येथे झाली या बैठकीसाठी नांदेड, हिंगोली, परभणी, बीड, लातूर या जिल्हातील प्रत्येक तालुक्यातून प्रमुख प्रतिनिधी या बैठकीस उपस्थित होते. यात हा प्रकल्प रद्द करावा अथवा शेतकऱ्यांच्या प्रेतांवरून बनवावा अशा संतापात भावना शेतकरी प्रतिनिधींनी व्यक्त केल्या मराठवाड्यातील सहा वातावरण शेतकऱ्यांच्या संतप्त भावना जिल्ह्यातुन हळद, केळी, फळबागा, ऊस बागायत पट्ट्यातून शक्तीपीठ महामार्ग प्रस्तावित आहे. हा महामार्ग खूप मोठ्या रुंदीचा असल्याने शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणावर उवजाऊ जमीन ही शासन संपादित करणार आहे. यामुळे असंख्य शेतकरी भूमिहीन तसेच अत्यल्पभूधारक होणार आहेत. परिणामी शेतकऱ्यांमध्ये चिंतेचा आहे. ह्याच मार्गावर अगोदरच तयार असलेला नागपूर रत्नागिरी महामार्ग असताना हा नवीन महामार्ग कशासाठी असा प्रश्न आता या भागातील शेतकरी आणि नागरिक उपस्थित करीत आहेत. या प्रश्नावर शनिवार परळी येथे मराठवाड्यातील प्रमुख शेतकरी प्रतिनिधी यांची बैठक संपन्न झाली या बैठकीत प्रामुख्याने होऊ घातलेला पवणार ते पत्रादेवी शीघ्र द्रुतगती (शक्तिपीठ) महामार्ग कायमचा रद्द करण्यात यावा. नागपूर ते मुंबई समृद्धी द्रुतगती महामार्ग मध्ये बाधित झालेल्या शेतकरी तसेच आजूबाजूच्या शेतकऱ्यांचे गावांचे त्रयस्थ संस्थेकडून सामाजिक सर्वेक्षण करण्यात यावे. आणि त्याचा जशास तसा अहवाल प्रसारित करण्यात यावा.पवणार ते पत्रादेवी शीघ्र द्रुतगती महामार्ग (शक्तिपीठ) महामार्ग बाबत निघालेले व इतर सर्व परिपत्रके रद्द करण्यात यावीत. हे प्रमुख तीन ठराव यावेळी मंजूर करण्यात आले आहे. शासनाने शेतकरी विरोधी हा शक्ती पीठ महामार्ग प्रकल्प रद्द करावा, जबरदस्ती ने हा प्रकल्प लादायांचा असेल तर आमच्या प्रेतावरून हा प्रकल्प न्यावा. अशा तीव्र स्वरूपाच्या भावना यावेळी शेतकऱ्यांनी व्यक्त करून दाखवल्या

## अशोक हिंगे यांनी घेतली अमोल खुणे यांची दवाखान्यात जाऊन भेट

**वादळवार्ता/गेवराई** मराठा आरक्षण योद्धा मनोज जरांगे पाटील यांचे खंदे समर्थक अमोल खुणे यांच्यावर अज्ञात व्यक्तीकडू प्राणघातक हल्ला करण्यात झाला होता त्यामुळे गेवराई सिव्हिल हॉस्पिटल येथे जाऊन वंचित बहुजन आघाडीचे बीड लोकसभेचे उमेदवार अशोक हिंगे पाटील हे अकोला येथून बीड कडे परत येत असताना रात्री अकरा वाजता त्यांची भेट घेऊन असतेवाईक पणे चौकशी केली व धीर दिला आहे. यावेळी त्यांच्यासोबत वंचितचे नेते ज्ञानेश्वर कवठेकर, बालाजी जगतकर अजय सरवदे, गेवराई



तालुकध्यक्ष, पप्पू गायकवाड, आदी उपस्थित होते. रात्रीचा त्यांच्यावर अंधाराचा फायदा घेत दगडफेक करून प्राण घातक हल्ला करण्यात आला होता. हल्लेखोर हे अज्ञात आहेत त्याची चौकशी करून आरोपींना तात्काळ अटक करून या मागचा सूत्रधार शोधावा या मागणीसाठी उद्या पोलीस अधिक्षक नंदकुमार ठाकूर यांची भेट घेनार आहेत.

## जिल्ह्याच्या नावाला शोभेल असा विजय पंकजाताईना मिळेल - खा. प्रितमताई

( बीड प्रतिनिधी ) विकास ही अखंड चालणारी प्रक्रिया आहे. विकासासाठी सातत्याने काम करावे लागते. जिल्ह्याचा विकास करण्याची नियत आणि क्षमता पंकजाताईकडे आहे. विरोधकांचे खोटे नाटे



आरोप ऐकून घेऊ नका. जिह्याच्या विकासासाठी पंकजाताईंची गरज आहे. भाजपा व शिवसेना एकत्र नांदणार हा नैसर्गिक नियम. आज राष्ट्रवादीही आपल्या सोबत आहे. हा दुग्ध शर्करा योग म्हणावा लागेल. भाजपासह महायुतीतील सर्व पक्ष कार्यकर्त्यांनी बूथ मजबूत ठेवला तर, ताईंना शोभेल असा विजय निश्चित होईल. असा विश्वास खा. डॉ. प्रितम मुंडे यांनी मांजरसुंबा येथील कार्यकर्ता बैठकीत व्यक्त केला.

## शेतक-यांना नुकसान भरपाई द्या : अ‍ॅड.जावेद मुस्ताक पटेल



**अंबाजोगाई/ परवेज पटेल**
बीड गेल्या काही दिवसात बीड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात वादळी वाऱ्यासह, अवकाळी पाऊस, गारपीठ झालेली असुन यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झालेले आहे. प्रशासनाकडून पंचनाम्याच्या नावावर वेळकाढू पणाचे धोरण आखले जात असुन असले पंचनाम्याचे गुऱ्हाळ बंद करुन शेतकऱ्यांना तत्काळ विनाअट नुकसान भरपाई देण्याची मागणी अ?ड. जावेद पटेल यांनी केली आहे. जिल्ह्यात आंबा, डाळिंब, टरबुज, पपई, टोमॅटो, मिरची, यासह फळबाग, भाजीपाला, उन्हाळी बाजरी यासारखे हातातोंडाशी आलेली पीके निस्तनाबुत झालेली आहेत. जगाचा पोशिंदा असलेला शेतकरी राजा अगोदरच संकटात असताना पुन्हा या नैसर्गिक आपत्तीमुळे बळीराजा हावलदिल झालेला आहे. अनेक ठिकाणी शेतकऱ्यांच्या घराचे व गुराढोरांच्या गोठ्याचे देखील मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. प्रशासनाकडून पंचनाम्याच्या नावावर वेळकाढू पणा केला जात असताना लोकसभेच्या निवडणुकीत दंग असलेल्या नेत्यांना शेतकऱ्याच्या अडचणीत किंवा त्यांच्या संकटात पाठबळ देण्यासाठी रोज वेळ दिसत नाही. मायबाप सरकारने मोठ मह मोठी भाषणे आणि घोषणा करण्यापेक्षा आज सां हवालदिल झालेल्या बळीराजाला तत्काळ विनाअट आर्थिक मदत करावी अशी मागणी अ?ड. जावेद मुस्ताक पटेल यांनी केली आहे.

## अशोक हिंगेची गिरवली येथील रामनवमी निमित्त उपस्थिती



**वादळवार्ता/अंबाजोगाई**
वंचित बहुजन आघाडीचे बीड लोकसभा उमेदवार यांनी दि.17 रामनवमी निमित्त शितलदास महाराज यांच्या मंदिरात घेतले दर्शन व गिरवली येथील पदाधिकारी कार्यकर्ते यांनी त्यांची गावातील प्रवेशा वेळी उस्फुर्त असे फटाके फोडून स्वागत केले. गिरवली गावा पारंपारिक रामनवमी उत्सवात घेतला सहभाग नोंदवला. त्याचबरोबर त्यांनी गावातील प्रतिष्ठित लोकांच्या गाठीभेटी घेतल्या त्यामध्ये कालिदासा अपेट, बन्सीअन्ना सिरसाठ,व्यंकटेश नागराळे पाटील यांच्या याची भेटी घेतली. अशोक हिंगे पाटील यांच्या सोबत,वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हाध्यक्ष शैलेश कांबळे,अँड.सतीश कळम पाटील,धम्मा कासारे,रवी शिरसाठ,पुरुषोत्तम वीर, बालाजी जगतकर,गोविंद मस्के, पवन जोगदंड,मंजा गायकवाड,झिरमीळे,आदी पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कोरड्या पात्रात खड्डे खोदून भागविली जाते गुरांची तहान

## सोयगाव तालुक्यातील जनावरांच्या पिण्याच्या पाण्याची स्थिती चिंताजनक

**वादळवार्ता/सोयगाव**
सोयगाव तालुक्यात पाण्याचे दुर्भिक्ष झाले आहे धरणे,पाझर तलाव कोरडेठाक झाली आहे त्यामुळे पाळीव जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे शेतातील विहिरी कोरड्या झाल्या आहे त्यामुळे शेतातील जनावरांना धरणांच्या व पाझर तलावांच्या कोरड्या पात्रात खड्डे खोदून जनावरांची तहान भागविली जात असल्याचा प्रकार सोयगाव तालुक्यात सुरू आहे

सोयगाव तालुक्यात ६७ हजार ८७५ पाळीव जनावरांची संख्या असल्याची पुष्टी पशुसंवर्धन विभागाने दिली आहे त्यामुळे या ६७ हजार जनावरांना पिण्याच्या पाण्याची तहान लागली आहे मात्र एकीकडे धरणे व पाझर तलाव कोरडे ठाक झाली आहे दुसरीकडे शेतातील विहिरी सुद्धा कोरड्या झालेल्या आहे त्यामुळे पाळीव जनावरांना चक्क एक दिवसा आड पिण्याचे पाणी मिळत आहे धरणात व पाझर तलावात कोरड्या पात्रात खड्डे खोदून काही पशुपालक जनावरांना पिण्यासाठी पाणी देत आहे तर विहिरीत एक दिवसा आड पाण्याचा साठोबा होत असल्याने विहिरीत पाणी आल्यावर शेतातील जनावरांना पिण्याच्या पाणी मिळत आहे त्यामुळे एक दिवसा आड जनावरांना पिण्याचे पाणी मिळत असल्याने जनावरांची तहान २४ तासांवर भागीविली जात आहे तालुका प्रशासनाने अद्यापही जनावरांच्या पिण्याच्या पाण्यासाठी हालचाली सुरू केल्या नसून सोयगाव तालुक्यात पाळीव जनावरांना टँकरने पाणी पुरवठा करण्याची वेळ आलेली असताना तालुका प्रशासन मात्र निवडणुकी च्या कामात व्यस्त आहे त्यामुळे जनावरांच्या घशाची कोरड वाढली आहे -----घोसला गावात सहा दिवसा पासून जनावरांना पाणी नाही घोसला शिवारात पाझर तलाव व धरणे आटल्याने पशुपालकांनी जनावरांना शेतात गोठ्यात सोडले आहे परंतु मागील आठवड्यात झालेल्या वादळी वाऱ्यात रोहित्र आडवे पडून काही वीज तारा तुटल्याने या शिवारातील वीज पंपाची विद्युत पुरवठा खंडित आहे त्यामुळे एक दिवसा आड होणारा विहिरीतील पाणी पुरवठा ही जनावरांना होत नाही महावितरण च्या दुर्लक्षामुळे घोसल्यातील जनावरांवर तहानलेल्या अवस्थेत राहण्याची वेळ आली आहे सहा दिवसा पासून या भागातील जनावरांना पिण्याच्या पाण्याचा थेंबही मिळालेला नाही महावितरण चे तांत्रिक लाईनमन गावात फ़िरकलेले नसल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.....

संपादकीय

# एक देशव्यापी श्रीरामचंद्र जन्मोत्सव

(श्रीराम नवमी: प्रभू श्रीरामचंद्र जन्मदिन विशेष.)

भगवान विष्णूंचा सातवा अवतार असणाऱ्या प्रभू श्रीराम यांचा जन्म चैत्र शुद्ध नवमी रोजी दुपारी १२ वाजता झाला. श्री राम नवमीचा सण दरवर्षी मोठ्या आनंदात साजरा केला जातो. या दिवशी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते, राम नवमी हा हिंदू धर्मातील शुभ सणांपैकी एक आहे. हा सण चैत्र नवरात्रीच्या नवव्या दिवशी साजरा केला जातो.

चैत्र शुद्ध नवमी हा हिंदू पंचागानुसार चैत्र महिन्यातील नवरात्राचा नववा दिवस आहे. या तिथीस भगवान विष्णूचा सातवा अवतार समजले गेलेले प्रभू श्रीराम यांचा जन्म झाला, अशी मान्यता आहे. हा दिवस श्री रामनवमी म्हणून साजरा करतात. श्रीराम नवमीला दुपारी सूर्य डोक्यावर आल्यावर- दुपारी १२:०० वाजता रामजन्माचा सोहळा होतो. श्रीरामाच्या मूर्तीला पाळण्यात घातले जाते. श्री रामांच्या चित्रास वा मूर्तीस इतर हारांसमवेतच गाठीपण घालतात. श्री रामांची पूजा करताना त्याना करंगळीजवळच्या बोटाने, म्हणजेच अनामिकेने गंध लावतात. तसेच श्रीरामांना हळद-कुंकू वहातांना आधी हळद अन् नंतर कुंकू, उजव्या हाताच्या अंगठा आणि अनामिका यांच्या चिमटीत घेऊन चरणांवर वाहतात. श्रीरामांना केवडा, चंपा, चमेली अन् जाई ही फुले वाहतात. त्यानंतर आरती करून प्रसाद वाटतात. रामजन्माच्या दिवशी साजऱ्या केल्या जाणाऱ्या उत्सवांत रामजन्माचा पाळणा अवश्य म्हटला जातो.

"श्रीराम जन्मला गं सखे;
श्रीराम जन्मला !!

श्रीराम नवमीच्या दिवशी मठ-मंदिरात भजन, पूजन, कीर्तन, प्रवचन इत्यादी कार्यक्रम करून हा जन्मोत्सव सोहळा साजरा केला जातो. काही ठिकाणी तर गुढीपाडवा ते श्रीराम नवमी या काळांत रामायण ग्रंथाचे वाचन, रामकथेचे निवेदन, गीत रामायणाचे गायन वगैरे कार्यक्रमही केले जातात. श्रीराम हे सर्व आबालवृद्धांची लाडकी देवता असल्यामुळे सर्व लहान थोर मंडळी या उत्सवात सहभागी होतात.

हिंदू धर्मग्रंथानुसार त्रेतायुगातील रावणाचे अत्याचार संपवण्यासाठी आणि धर्माची पुनर्स्थापना करण्यासाठी भगवान विष्णूने मृत्यूच्या जगात- मृत्यूलोकात श्रीराम म्हणून अवतार घेतला. प्रभू श्रीरामचंद्रजींचा जन्म चैत्र शुक्ल नवमीला राणी कौशल्याच्या पोटी पुनर्वसु नक्षत्रात आणि कर्क राशीत राजा दशरथाच्या घरी झाला. रामायणानुसार अयोध्येचा राजा दशरथ याला तीन बायका होत्या, परंतु फार काळ राजा दशरथला संततीचे सुख कोणीही देऊ शकल्या नाही, त्यामुळे राजा दशरथ खूप अस्वस्थ असायचे. पुत्रप्राप्तीसाठी राजा दशरथ यांना वशिष्ठ ऋषींनी पुत्रकामेष्टी यज्ञ करण्याची कल्पना दिली होती. यानंतर राजा दशरथाने आपल्या जमाई महर्षी ऋषिश्रृंगासोबत यज्ञ केला. त्यानंतर यज्ञकुंडातून एक दैवी पुरुष हातात खीरीची वाटी घेऊन बाहेर आला. यज्ञ संपल्यानंतर महर्षी ऋषीश्रृंगाने दशरथाच्या तीन पत्नींना खीरीची वाटी खायला दिली. खीर खाल्ल्यानंतर काही महिन्यांनी तिन्ही राण्या गरोदर राहिल्या. बरोबर ९ महिन्यांनंतर राजा दशरथाची ज्येष्ठ राणी कौशल्याने श्रीराम- भगवान विष्णूचा सातवा अवतार, कैकेयी यांनी भरत आणि सुमित्रा यांनी लक्ष्मण आणि शत्रुघ्न यांना जन्म दिला. भगवान श्रीरामाचा जन्म दुष्ट प्राण्यांचा नाश करण्यासाठी पृथ्वीवर झाला होता.

संतशिरोमणी कबीर साहेबजी आदिरामाची व्याख्या स्पष्ट करतात, की आदिराम हा अविनाशी देव आहे जो सर्वांचा निर्माता आणि पालनकर्ता आहे. ज्याच्या एका इशाऱ्यावर पृथ्वी आणि आकाश कार्य करतात, ज्याच्या स्तुतीमध्ये तेहतीस श्रेणी देवी-देवता नतमस्तक होतात. जो पूर्णपणे मोक्षदाता आणि आत्मस्वरूप आहे. भारतभर श्रीरामजन्म हा चैत्र शुक्ल नवमीला झाला असे समजले जात असले तरी, ज्या अयोध्येत रामाचा जन्म झाला, त्या अयॊध्येतील वैश्य समाज श्रीरामाचा जन्म मार्गशीर्ष महिन्यातील पंचमीला झाला, असे मानतात. त्या पंचमीला अगहन पंचमी म्हणतात. कारण मार्गशीर्षाला हिंदीत अगहन म्हणतात! याला आधार म्हणजे गोस्वामी संत तुळशीदासाच्या "रामचरित मानस" मधील पुढील उल्लेख-

"मंगल मूल लगन दिनु आया|
हिम रिपु अगहन मासु सुहावा||
ग्रह तिथि नखतु जोगु वर बारू|
लगन सोधि विधि कीन्ह विचारू||"

श्रीराम नवमी संपूर्ण भारतात साजरी केली जाते. तेलंगणातील भद्राचलम मंदिर हे अशा ठिकाणांपैकी एक आहे जिथे श्रीराम नवमी मोठ्या थाटामाटात साजरी केली जाते. चैत्र नवरात्रीचीही समाप्ती श्रीराम नवमीच्या दिवशी होते. हिंदू धर्मग्रंथानुसार भगवान श्रीरामजींचा जन्म या दिवशी झाला होता, म्हणून भक्त ही शुभ तिथी पावन श्रीराम नवमी म्हणून साजरी करतात आणि पावन नद्यांमध्ये पवित्र स्नान करतात.

हिंदू कॅलेंडरनुसार श्रीराम नवमी हा सण चैत्र महिन्याच्या शुक्ल पक्षाच्या नवव्या दिवशी साजरा केला जातो. धर्मग्रंथानुसार भगवान श्रीरामांचा जन्म याच दिवशी झाला, म्हणून हा दिवस श्रीराम जन्मोत्सव म्हणून साजरा केला जातो. प्रभू श्रीरामचंद्रजींच्या जन्मोत्सवामुळे या तिथीला श्रीराम नवमी असे म्हणतात. भगवान रामाला विष्णूचा अवतार मानले जाते. भगवान विष्णूंनी पृथ्वीवरील राक्षसांना मारण्यासाठी त्रेतायुगात श्रीराम म्हणून मानव अवतार घेतला. प्रभू श्रीरामाला मर्यादा पुरुषोत्तम म्हटले जाते, कारण त्यांनी आपल्या आयुष्यात अनेक संकटे सोसूनही प्रतिष्ठित जीवनाचे उत्तम उदाहरण मांडले. प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी आपला आदर्श सोडला नाही आणि जीवन सन्मानाने जगले. त्यामुळेच त्यांना सर्वोत्तम पुरुषाचे स्थान देण्यात आले आहे.

या दिवशी विशेषत: श्रीरामाची पूजा करून विविध कार्यक्रमांचे आयोजन करून त्यांचा जन्मोत्सव साजरा केला जातो.

# कलाकृतीची मंदिरे फक्त बांधण्याची होड!

[आंतरराष्ट्रीय वारसा दिवस विशेष.]

आपल्याकडे समाज एकसंध राहण्यासाठी कलाकृतीची मंदिरे बांधण्याचा प्रभाव यादव, शिलाहार काळापासून चालत आला आहे. युनेस्कोतर्फे १८ एप्रिल हा दिवस जागतिक वारसा दिन म्हणून साजरा केला जातो. लिखित स्वरूपाच्या इतिहासाबरोबर वास्तुरुपी राष्ट्रवैभवाचे योग्य संवर्धन करणे हे सरकार बरोबर सुजाण नागरिकांचेही कर्तव्य आहे. याची समाजमनाला जाणिव करून देण्यासाठी युनेस्कोतर्फे हा दिवस जागतिक वारसा दिन म्हणून साजरा केला जातो, त्यानिमित्ताने श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरुजींचा हा लेख...
.

आपल्या समाजमनात प्रौढशिक्षण, लैंगिकशिक्षण या विषयांप्रमाणे प्राचीन वारसावास्तूंचे महत्त्व आणि संवर्धनाबाबत अज्ञान, बेफिकिरी आणि उदासिनता आहे. हा विषय सर्वत्र पोचवायचा असेल तर दृकश्राव्य माध्यमाबरोबर साध्यासोप्या भाषेतून त्यावर विपुल लेखन होणे गरजेचे आहे. तरच संस्कारक्षम विद्यार्थ्यांपासून, अशिक्षित, असंस्कृत पर्यटकांना त्याची जाण येईल. पाश्चिमात्य राष्ट्रांसह इजिप्तसारख्या पुरातन वास्तूवैभवाच्या देशातील वारसासंवर्धनाच्या जाणीवेची उणीव आपल्याकडे प्रकर्षांने जाणवते. आमची अलौकिक कलाकृतीची मंदिरे ही फक्त धार्मिक ठिकाणच नव्हती, तर सभोवतालचा समाज एकसंघ राहण्यासाठी ती शैक्षणिक, सांस्कृतिक केंद्रे होती. हे आम्ही ध्यानात का घेत नाहीत? या मंदिरवास्तूंच्या व्यासपीठावरून नृत्य, किर्तन, गायन, प्रवचन, भारूड, पाठशाळा यांच्याबरोबर प्रांगणात आठवडी बाजार, जत्रा, मंडई उपक्रम राबवले जात होते. बरोबरीने न्यायनिवाडा करण्याचे ते एक समाजमान्य न्यायालयही होतेच. याशिवाय मंदिर माध्यमाद्वारे वाद घालून संवाद साधण्याचे हे लोकांचे एक हक्काचे ठिकाण होते. तर व्याख्यान, प्रवचनांद्वारे लोकोपयोगी माहिती पुरवण्याचा परिपाठ तर वाखाणण्याजोगा होता. आता हे सारे इतिहासजमा होताहेत, याचीच मनाला खंत वाटते!

पृथ्वीवर जशी काळानुरूप नैसर्गिक स्थित्यंतरे सतत घडत असतात, तशी अनेक क्षेत्रात मानव निर्मित घटकांतही परिवर्तन घडत असते. त्यात कला क्षेत्राप्रमाणे सांस्कृतिक तसेच ऐतिहासिक क्षेत्रातही बदल घडत असतात. त्यात मानवाने आपल्या संस्कृतीचे मापदंड गणल्या जाणाऱ्या कलाकृती निर्माण केल्यास त्यांना इतिहासाच्या पाऊल खुणांबरोबर धार्मिक अधिष्ठानासह सांस्कृतिक मोलही आहे. त्यातील काहींना राष्ट्राच्या अस्मितेची शान आहे. त्यात गडकोट, कमानी, राजवाडे, मनोरे, विजयस्तंभ प्रशासकीय इमारती आदींचा समावेश आहे. हजारो वर्षांच्या इतिहासात अनेक राज्यकर्त्यांनी आपल्या धर्माच्या आधारावर, तत्त्वप्रणालीनुसार लेणी, स्तुप, मंदिर, चर्च, मशीदी, मनोरे, कमानी उभारल्या, त्या वारसा वास्तु गणल्या गेल्या. लिखित स्वरूपाच्या इतिहासाबरोबर या राष्ट्रवैभवाचे योग्य संवर्धन करणे, हे सरकार बरोबर सुजाण नागरिकांचेही कर्तव्य आहे. याची समाजमनाला जाणिव करून देण्यासाठी युनेस्कोतर्फे १८ एप्रिल हा दिवस जागतिक वारसा दिन म्हणून साजरा केला जातो. आपल्याकडे समाज एकसंध राहण्यासाठी कलाकृतीची मंदिरे बांधण्याचा प्रभाव यादव, शिलाहार काळापासून आहे. वारसा वास्तुप्रकारात मंदिर वास्तूंचे प्रमाण सर्वाधिक आहे. त्यावरील कलाकृती ही पर्यटक, अभ्यासकांना भूरळ घालणारी आहे. परंतु दुर्दैवाने या बऱ्याच मंदिरांसह, लेण्या, गुहामंदिरे, गडकोट, कमानी यांची आजची अवस्था दयनीय असून त्यांचे अस्तित्वच धोक्यात आले आहे. आता नवीन मंदिरे उभारताना त्यावर मार्बल, ग्रेनाईट आदींचा साज चढवून ते सुशोभित करण्याच्या प्रयत्नात त्यांचा मूळ ढाचा, बाज, प्राचीन स्थापत्य कौशल्य नाहीसे होत चाललेय. त्यामुळे आमचा प्राचीन बांधकाम वारसाच नष्ट होतोय. आर्थिक पाठबळाच्या आधारावर नवीन मंदिरवास्तू उभारताना ज्या नवीन मंदिरवास्तू उभारल्या जाताहेत, पण प्रादेशिक वास्तुकलेच्या प्राचीन मंदिरांच्या संवर्धनाकडे दुर्लक्ष होत आहे. आधुनिकपणा बरोबर नावीन्याची कास धरताना आम्ही आमचा वैभवशाली वारसा विसरत चाललोय हेच यातून जाणवते.

भारतातील प्राचीन संस्कृती दर्शवणाऱ्या वारसावास्तू, लेण्या, स्तुप आदी पाहण्यासाठी जगभरचे पर्यटक, अभ्यासक येत असतात. मात्र इतिहासाचे मापदंड ठरलेल्या या घटकांच्या संवर्धनाची समाजात व शासकीय पातळीवरही जाणीव नाही, दुर्दैव! याकडे होणारे दुर्लक्ष अक्षम्य असून भावीकाळात हा राष्ट्रीय ठेवा इतिहासजमा होण्याची वेळ येऊन ठेपली आहे. परिसराचा विकास साधताना, धरण प्रकल्प निर्माण होताना प्राचीन वास्तूंना जलसमाधी का लाभली? याचे कुणालाच सोयरसुतक नाही. आपल्याकडे पुरातत्त्वखाते कायम उपेक्षितच राहिले आहेत. वारसा स्थळांच्याद्वारे प्राप्त होणारा महसूल अत्यल्प असेल, या कारणाने या खात्याकडे गांभीर्यानेही पाहिले जात नाही. देशातील वारसावास्तूंची संख्या आणि त्यांच्या संवर्धनासाठी मंजूर निधी, याचे प्रमाण तर हास्यास्पद आहे. लोप पावलेल्या अज्ञात संस्कृतीला जनमानसासमोर आणून तिच्या इतिहासासह त्यावेळच्या समाजजीवनावर प्रकाश झोत टाकण्याचे काम पुरातत्त्व अभ्यासाद्वारे होत असते. हेच पुरातत्व शास्त्राला अभिप्रेत आहे. इ.स.१७८४मध्ये आपल्या देशात एशियाटिक सोसायटीची स्थापना करून पुरातत्व शास्त्राचा पाया घातला गेला. त्याला शास्त्रीय अभ्यासाची जोड देण्यासाठी १८६० साली आर्किऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया ही अस्थापना स्थापन करून ब्रिटिश प्रशासकांनी पुरातत्वखात्याला प्रोत्साहन दिले होते. ग्रामीण भागात प्राचीन मूर्ती विरघळत, शिलालेख रस्त्याच्या कडेला उनपावसात तडाखे सोसत उभे आहेत, तर काही वारसा वास्तूंचे अवशेष आपल्या घरांच्या पायऱ्यासाठीही वापर करून आपली गरज भागविली जात आहे. येथील काही किल्ले, लेण्या, स्तंभावर खडू- कोळशाने आपले नाव ठळकपणे लिहून आपण या ठिकाणी आपल्या मैत्रिणींसह भेट दिल्याचा पुरावा दर्शवणाऱ्या खुणा पाहून पर्यटकांच्या असंस्कृतपणाची कीव करावीशी वाटते. खरं तर, ही पुरातन कलाकृती निर्माण करणारे कलाकार अज्ञात आहेत, परंतु असले आचरटाचार्य पर्यटक सवंग प्रसिद्धीच्या हव्यासापोटी या वास्तूसौंदर्याला बाधा आणतात. जसा निसर्गाचे मोल जाणणारा पर्यटक वनपर्यटनाला हवा आहे, तसाच वारसा वास्तूचे मोल जाणणारा अभ्यासूपर्यटक असेल, तरच या राष्ट्रवैभवाचे संवर्धन होईल. भूकंपासारख्या आपत्तीतही काही प्राचीन मंदिर वास्तूंवर परिणाम झाला नाही तेव्हा पूर्वीच्या बांधकाम तंत्रज्ञानाचा अभ्यास करून या शास्त्राच्या आधारावर इमारती बांधकामाचे तंत्रज्ञान विकसित करण्याचा विचारही आम्हाला सूचत नाही.

खोदकाम करताना अनेकदा जुन्या वस्तू, मूर्ती आढळतात. त्या शैक्षणिक संस्था, ग्रामपंचायत तालुका तहसिलदार यांच्याकडे जमा करून अखेरीस प्रत्येक जिल्हा पातळीवर चांगले वस्तुसंग्रहालय निर्माण होणे शक्य आहे. पण सरकारी जाच-काच व नियमांचा कोलदांडा टाकण्यासाठी याची कुठेच नोंद होत नाही. त्यासाठी सुजाण नागरिकांबरोबर लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेणे आवश्यक आहे, पण हा ठेवा जतन करण्यासाठी अभ्यासू लोकप्रतिनिधी व प्रशासकांची आवश्यकता आहे. शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी वारसा वास्तू दर्शन सहलींचे हेरिटेज वर्क आयोजन करून या वारसावास्तू स्थळदर्शनाद्वारे या अनमोल ठेव्याचे संवर्धन करणे कसे आवश्यक आहे, हे त्यांच्या मनावर बिंबवता येईल. त्यासाठी प्रथमत: त्यांच्या अभ्यासक्रमातच या विषयाचा समावेश करावा लागेल. बऱ्याचदा सहल व्यवस्थापक गाईडची भूमिका पार पाडतो. आयोजित सहलीचे वेळापत्रक सांभाळणारा हा व्यवस्थापक वारसा वास्तू अभ्यासक, मार्गदर्शक असेलच असे नाही. तो स्थानिक मार्गदर्शकांकडे पर्यटकांच्या गटाला सोपवून मोकळा होतो. यासाठी सहल व्यवस्थापकानाच वारसावास्तू मार्गदर्शनाचे प्रशिक्षण हवे. बऱ्याच पर्यटकांना वारसा स्थळ दर्शनापेक्षा भोजन खरेदीतच जास्त स्वारस्य असते. अनेक वारसावास्तू स्थळ दर्शनात अधिकृत मार्गदर्शकच नसतो आणि जो स्थानिक स्वयंघोषित मार्गदर्शक असतो, ती तर प्रचलित दंतकथा सांगत या ठिकाणी कोणत्या चित्रपटांचे छायाचित्रण झाले हे सांगण्यात धन्यता मानतो व ऐकणारे पर्यटकही आपली सहल सत्कारणी धन्यता मानतो. ऐकणारे पर्यटकही आपली सहल सत्कारणी लागल्याचं समाधान घेऊन भोजन- खरेदीसाठी तत्परतेने परततील. किंवा या स्थळाची आजची अवस्था पाहून सरकारी यंत्रणेला दोष देत काही वेळ हळहळतील, पण याच ठिकाणी आडोशाला मद्यपानाचा आस्वाद घेऊन सहलीचा आनंद द्विगुणीत करतील. फार तर घरी परत त्यावर एखाद्या वृत्तपत्रातून त्या वारसा स्थळाच्या आजच्या सोचनीय स्थितीबद्दल पत्र प्रसिद्ध करून राष्ट्रीय कर्तव्य पार पाडल्याच समाधान मानणारे पर्यटक भरपूर आ हे त .

वैयक्तिक छंद म्हणून काहींनी स्वत:चे वस्तुसंग्रहालय उभारले आहे. त्यांना शासकीय मान्यतेसह अनुदान दिल्यास प्राचीन वारसा संवर्धन कामाला प्रोत्साहन मिळेल. काही कुटुंबांकडे जुनी शस्त्रे, वस्तू आहेत त्यांनाही मदतीसह आवाहन करून हा ठेवा संग्रहालयात सुपूर्द करण्यासाठी प्रोत्साहन दिल्यास संग्रहालयात त्याचे योग्य जतन होईल. सक्षम ज्येष्ठ नागरिकांच्या ज्ञानासह त्यांच्या क्षमतेचा उपयोग करून घेतला जात नाही. इतिहास, प्राचीन वास्तू, संस्कृती यात गती असलेल्या ज्येष्ठांना मार्गदर्शक म्हणून काम करण्याची तयारी असूनही त्यांच्या आवाहनाला शासन दरबारी प्रतिसाद नाही. काही वारसा वास्तूसमुहाची परिक्षेत्र व्याप्ती मोठी असते, तेव्हा प्रवेश द्वारीच मार्गदर्शक नकाशा व संक्षिप्त माहितीफलकच नसतो आणि जो असतो तो वाचणे अशक्य असते. मात्र असल्या स्थळी प्रवेश शुल्क तत्परतेने आकारले जाते. आता मानवनिर्मित वारसा कलाकृती बरोबर काही नैसर्गिक स्थळांची दखल युनेस्कोने घेऊन त्यांचाही जागतिक वारसा स्थळात समावेश केला आहे. त्यात महाराष्ट्रातील पश्चिम घाट क्षेत्रातील चार स्थळांचा समावेश झाला आहे. परंतु या अजस्त्र घाटमाथ्यावरील निसर्गराजा जसा आम्हाला खचितच क्षमा करणार नाही, तसेच वारसा वास्तूसंवर्धनाची उपेक्षाही हेच सांगते, हे विशेष!

!! विश्व वारसा दिनाच्या सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

**श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरुजी. गडचिरोली, फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३.**

# महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आत्मसात केले पाहिजेत-डॉ हनुमंत सौदागर

## जवळबन येथे भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंतीमहोत्सव साजरा

**वादळवार्ता/केज**

महापुरुषांना डोक्यावर घेऊन नाचण्यापेक्षा त्यांचे विचार डोक्यात रुजवण्याची गरज आहे. भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार भारताला महासत्ता बनवू शकतील. दुष्काळ निवारणासाठी बाबासाहेबांचे विचार मौलिक आहेत असे मत डॉ हनुमंत सौदागर यांनी व्यक्त केले ते तालुक्यातील जवळबन येथे कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष सरपंचपती प्रमोद करपे उपसरपंच, धनराज करपे ग्रामसेवक श्री मोरे ,दिलीप जोगदंड ,भास्कर जोगदंड ,अर्जुन वैरागे,प्रताप भाकरे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना ते म्हणाले जगातला सर्वात हुशार विद्यार्थी म्हणून बाबासाहेबांचा सन्मान होतो हे आजच्या विद्यार्थ्यांनी लक्षात घेणे आवश्यक आहे. असे मत व्यक्त केले. प्रमोद करपे म्हणाले या गावचा जन्मोत्सव नेहमीच सर्वांना ऊर्जा देत राहतो असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुनील जोगदंड यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष विश्वजीत जोगदंड, उपाध्यक्ष. राहुल जोगदंड, कोषाध्यक्ष. हरिश्चंद्र जोगदंड,सचिव. विष्णु जोगदंड,अविनाश जोगदंड, विकास



वाघमारे,अभिषेक जोगदंड,श्रेयस जोगदंड,शिरीष जोगदंड,धम्मा जोगदंड,संकेत जोगदंड,अमोल जोगदंड,मुन्ना जोगदंड,अमित जोगदंड,आदित्य जोगदंड,संघर्ष कला पथक आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## चैत्र सप्तमी निमित्ताने मर्दनगड किल्यावर एकविरा शिवभक्तांचा महापूर

**उरण/विठ्ठल ममताबादे**

उरण तालुक्यातील आवरे येथील मर्दनगड किल्ल्यावर सह्याद्री प्रतिष्ठान व मर्दनगड संवर्धन समिती आवरे तर्फे बांधण्यात आलेल्या एकविरा देवी मंदिरात चैत्र सप्तमी निमित्ताने एकविरा माता उत्सव मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आला. उत्सवाच्या निमित्ताने आयोजक मर्दनगड संवर्धन समिती संस्थापक कौशिक ठाकुर , सरपंच निराताई पाटील,सामाजिक कार्यकर्ते राजू मुंबईकर, प्रभाकर म्हात्रे,महेश गांवड, गणेशप्रसाद गांवड , संदीप गांवड ,विद्याधर गांवड , गाव अध्यक्ष संजय गांवड ,ग्रामपंचायत सदस्य संतोष पाटील,अरुण गांवड, बाळकृष्ण गांवड कृष्णा पाटील , गड संवर्धक प्रशांत भोईर या मान्यवरांच्या उपस्थितीत अभिषेक,होम ,गडपूजन, व पालखी सोहळा अश्या अनेक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.आवरे गावातील व पंचक्रोशीतील एकविरा शिवभक्तांनी सकाळ पासून उपस्थिती दाखवून आई माऊलीचा उदो उदोच्या जय घोषात दर्शन घेतले.ग्रामस्थ आवरे ,एकविरा बिटस चे आशुतोष म्हात्रे,सोमवार आरती, मंडळ, खासरी पाडा महिला मंडळ यांनी मोलाचे सहकार्य केले.सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शंकर पाटील,दिपेश ठाकूर, दिलेश ठाकूर, विनोद ठाकूर, हितेंद्र म्हात्रे,तुषार म्हात्रे,संजय गावंड,धिरज ठाकूर, संतोष म्हात्रे यांनी मेहनत घेतली.

## बीड जिल्हयाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी सोनवणे बंधु एकत्र ,



एकीकडे बीड लोकसभेच्या महायुतीच्या उमेदवार माजी ग्रामविकास मंत्री पंकजा मुंडे यांना विजयी करण्यासाठी त्यांचे बंधु कृषी मंत्री धनजंय मुंडे हे बहिन-भाऊ एकत्र येतात तर दुसरीकडे महविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांचे बंधु राहुल सोनवणे हे बंधु एकत्र येतात. मात्र विजयाची बांधीलकी कोण जोपासणार याकडे बीड जिल्ह्याचे लक्ष.

# दुष्काळाच्या अनुदानाचा मुहूर्त; सोयगाव तालुक्यात १२ हजार ७०५ लाभार्थ्यांच्या खात्यात थेट अनुदान जमा ;गुरुवार पासून वितरण...

## सोयगाव तालुक्यात ३२ हजार २९८ दुष्काळाने बाधित शेतकऱ्यांना ३५ कोटी ८१ लक्ष रु निधीची मान्यता शासनाने दिलो आहे

**वादळवार्ता/सोयगाव**

ऑक्टोबर महिन्यात जाहीर झालेल्या अती गंभीर दुष्काळाच्या नुकसानी ची भरपाईची रक्कम बुधवारी शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाल्याचे संदेश १२ हजार ७०५ शेतकऱ्यांच्या मोबाईल वर दुपारपासून सुरू झाले होते दरम्यान ई के वाय सी ची प्रक्रिया पूर्ण केलेल्या शेतकऱ्यांनाच पहिल्या टप्प्यात दुष्काळ च्या अनुदानाचा लाभ मिळाला आहे त्यामुळे १२ हजार ७०५ शेतकऱ्यांच्या ई के वाय सी झालेल्या या शेतकऱ्यांच्या थेट खात्यात तेरा कोटी ९० लक्ष रु रक्कम जमा झाली आहे गुरुवार( ता.१८) पासून बँकेत या अनुदाना च्या रक्कमेची वितरण सुरू करण्यात येणार आहे. त्यामुळे सोयगाव च्या दुष्काळाच्या अनुदानाच्या रक्कमेचा मुहूर्त तब्बल सहा महिन्यांनी निघाला आहे

सोयगाव तालुक्यात ३२ हजार २९८ दुष्काळाने बाधित शेतकऱ्यांना ३५ कोटी ८१ लक्ष रु निधीची मान्यता शासनाने दिलो आहे त्यापैकी ई पंचनामा पोर्टलवर २२ हजार शेतकऱ्यांची नावे तालुका आपत्ती व्यवस्थापन विभागाने अपलोड केली होती परंतु दुष्काळाच्या अनुदाना साठी ई के वाय सी आवश्यक केल्याने २२ हजार पैकी १९ हजार ७०५ शेतकऱ्यांनी ई के वाय सी ची प्रक्रिया पूर्ण केली आहे त्यापैकी सात हजार शेतकऱ्यांनी तीन दिवसापूर्वी ई के वाय सी केल्या मुळे या शेतकऱ्यांना दुष्काळ अनुदान अद्याप खात्यात जमा झालेले नसून १२ हजार ७०५ शेतकऱ्यांना पहिल्या टप्प्यात तेरा कोटी ९० लाख थेट खात्यात जमा झाले आहे नुकतीच ई के वाय सी केलेल्या शेतकऱ्यांना पुढील चार ते पाच दिवसात अनुदान मिळेल असे तहसीलदार मनीषा मेने यांनी सांगितले

## हनुमान कोळीवाडा गावात श्रीराम जन्मोत्सव उत्साहात साजरा.



**उरण/विठ्ठल ममताबादे**

उरण तालुक्यातील हनुमान कोळीवाडा गावात श्रीराम मंदिरात श्रीराम जन्मोत्सव मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. भजन, आरती, महाप्रसाद, पालखी मिरवणूक, प्रमुख पाहुण्यांचे स्वागत आदी विविध धार्मिक सामाजिक उपक्रमांचे आयोजन याप्रसंगी करण्यात आले होते.ग्रामसुधारणा मंडळ शेवा कोळीवाडा, महाराष्ट्र स्मॉल स्केल ट्रेडिशनल फिश वर्कर्स युनियन, ग्रामस्थ हनुमान कोळीवाडा, पारंपारिक मच्छिमार सामाजिक बचाव कृती समिती, शेवा कोळीवाडा विस्थापित महिला संघटना या संघटनेच्या माध्यमातून हनुमान कोळीवाडा गावात श्रीराम जन्मोत्सवाचे आयोजन करण्यात आले. श्रीराम जन्मोत्सव निमित्त आयोजित केलेल्या सर्वच कार्यक्रमांना जनतेचा, नागरिकांचा उत्तम प्रतिसाद लाभला आहे. सदर सर्व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रामसुधारणा मंडळ शेवा कोळीवाडा, महाराष्ट्र स्मॉल स्केल ट्रेडिशनल फिश वर्कर्स युनियन, ग्रामस्थ हनुमान कोळीवाडा, पारंपारिक मच्छिमार सामाजिक बचाव कृती समिती, शेवा कोळीवाडा विस्थापित महिला संघटना या संघटनेच्या सर्व पदाधिकारी सदस्यांनी विशेष मेहनत घेतली.

## जिवाची वाडी येथे लॅब व मेडीकलचा भव्य शुभारंभ.

वादळवार्ता/येवता

केज तालुक्यातील जिवाची वाडी येथे प्रभू श्रीरामचंद्र/ नवमीचे आवचित्त सादुन डोंगरी व दुर्गम भाग असलेले खेडेगाव जिवाची वाडी येथे सुरज चौरे यांनी ओम साई क्लिनिक लॅब आणि सुरेश चौरे यांनी मेडीकल स्टोअर्स एकाच दिवशी दोन्ही तरुणांनी आरोग्य सेवेचा उद्योग सुरु करून जिवाची वाडी गावाचे नाव वाडी जरी असले तरी हे गाव डोंगरी व दुर्गम भागात असुन गावाची लोकसंख्या ८००० असुन दावाखाना,लॅब व मेडीकल स्टोअर्स तिनही आरोग्याच्या सुविधा गावातच सुरू झालेने वैभवात भर पडली आहे. पूर्वी तालुक्याच्या ठिकाणी २०कि.मी. दुर जावे लागत होते, पूर्ण दिवस प्रवाशात वेळ जात होता,आता मात्र आजारी रुग्न पेशंन्टला जागेवरच आरोग्य सुविधा सर्व सेवा मिळणार असलेने ग्रामस्त




भिकाराम सारूक,गोकुळ चौरे,चिंतामण चौरे,बब्रुव्हान चौरे, नामदेव चौरे,गोपीनाथ चौरे, राजाभाऊ चौरे,दादाराव चौरे,डॉ. दादासाहेब चौरे,धनराज चौरे,हनुमंत कांबळे आदी उपस्थित होते.

## समाजवादी गणराज्य पार्टीचा अकोल्यात बाळासाहेब आंबेडकर यांना पाठिंबा !

वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर अकोला लोकसभेची निवडणूक लढत आहेत. आज समाजवादी गणराज्य पार्टीचे अध्यक्ष आमदार कपिल पाटील यांनी आज यशवंत भवन, अकोला येथे प्रकाश आंबेडकर यांची भेट घेऊन समाजवादी जनता परिवाराच्यावतीने त्यांना समर्थन आणि सक्रीय पाठिंबा जाहीर केला.



# आज इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांचा गेवराई तालुका प्रचार दौरा

## मतदारांच्या गाठीभेटी घेत संवाद साधणार

**वादळवार्ता/बीड**

बीड लोकसभेचे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे व महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे हे गुरुवारी (दि. १८) गेवराई तालुक्याचा प्रचार दौरा करणार असून विविध गावांना भेटी देत मतदारांशी संवाद साधणार आहेत.

बीड लोकसभेचे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे व इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे हे गुरुवारी प्रचारासाठी गेवराई तालुक्याचा दौरा करणार आहेत. त्यानुसार सकाळी ८ वाजता बागपिंपळगाव, सकाळी ८.३० वाजता गोपाळ वस्ती, सकाळी ९ वाजता बेलगाव, सकाळी ९.३० वाजता रामनगर तांडा, सकाळी १० वाजता धोंडराई कॅम्प, सकाळी १०.३० वाजता धोंडराई, सकाळी ११ वाजता तळणेवाडी, सकाळी ११.३० वाजता भोजगाव, दुपारी १२ वाजता बोरीपिंपळगाव, दुपारी १२.३० वाजता उमापूर, दुपारी १.३० वाजता चकलांबा, दुपारी २.३० वाजता माटेगाव, दुपारी ३ वाजता कुंभेजळगाव, दुपारी ३.३० वाजता देवपिंप्री, दुपारी ४ वाजता भाटअंतरवली, दुपारी ४.३० वाजता राजपिंप्री, सायंकाळी ५.३० वाजता गौंडगाव, सायंकाळी ६ वाजता पांढरवाडी या गावांना भेटी देऊन मतदारांशी संवाद साधून अडीअडचणी जाणून घेत आपली भूमिका मांडणार आहेत. या दौऱ्यात राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट, काँग्रेस, उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेसह इंडिया आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले आहे.



# अपघाती मृत्यू झालेल्या सचिन नाईक यांच्या कुटुंबियांना पत्रकार संघाचा मदतीचा हात

## उमद्या पत्रकाराला माजगावकर मुकले : वसंत मुंडे



माजलगाव येथील तरूण पत्रकार सचिन नाईक यांच्या अपघाती निधनामुळे माजगावकर उमद्या पत्रकाराला मुकले आहेत, अशा शब्दांत महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी आपल्या शोक भावना व्यक्त केल्या. बुधवार, १७ एप्रिल रोजी प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी नाईक यांच्या निवासस्थानी भेट देऊन त्यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन केले. यावेळी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने नाईक यांच्या कुटुंबियांना त्यांचे वडील, बंधू यांच्याकडे अर्थिक मदत सुपूर्द करण्यात आली. माजलगाव येथील तरूण पत्रकार सचिन नाईक यांचे काही दिवसांपूर्वी अपघाती निधन झाले. सचिन नाईक हा कुटुंबातील कर्ता होता. त्यांच्यावर कुटुंबाची जबाबदारी होती. आई - वडील वयोवृद्ध आहेत. नाईक कुटुंबियांवर कोसळलेल्या दुःखात महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ सहभागी आहे. मदतीचा हात म्हणून महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघातर्फे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या पुढाकारातून मराठवाडा अध्यक्ष वैभव स्वामी, राज्य कार्यकारिणी सदस्य बाबा देशमाने, प्रा. सुदर्शन स्वामी, परमेश्वर सोळंके, किसन भदर्गे, रविकांत उघडे,संतोष जेथलिया यांनी सांत्वनपर भेट घेत आर्थिक मदत केली.

# मौजे वांगी बु. येथील स्वस्त धान्य दुकानदाराच्या मापात पाप

## राशन काळ्या बाजारात विक्री केल्या प्रकरणी ग्रामस्थांची तहसिलदार कडे धाव -

माजलगांव : ( प्रतिनिधी ) तालुक्यातील मौजे वांगी बु. येथील राशन दुकानदार सुखदेव मुंजाजी गरड यांनी मापात पाप करत तिन ते चार महिन्याचे राशन काळ्या बाजारात विक्री केल्या प्रकरणी समस्त ग्रामस्थांनी सदरील स्वस्त ध्यान्य दुकानदाराच्या विरोधात तहसिलदार यांच्या कडे धाव घेतली असून मौजे वांगी बु. येथील गोर गरीब जनतेला न्याय मिळवून द्यावा अशी निवेदनाद्वारे मागणी केली आहे. केंद्रशासन व महाराष्ट्र शासनाच्या वतीनं गोर - गरिब जनते साठी प्रत्येक महीण्याला स्वस्त धान्य दुकानांव्दारे मोफत गहू - तांदूळ राशनचे वाटप करण्यात यावे असे आदेश दिले आहेत. परंतू माजलगांव तालुक्यातील मौजे वांगी बु. येथील राशन दुकानदार नामे सुखदेव मुंजाजी गरड हे शासनाच्या आदेशाची पायमल्ली करून मापात पाप करत शासनाचा आलेला मोफत शिधा तिन ते चार महिन्यांतून एकदाच अन् तेही एकाच महिण्याचे राशन किलोवर नाही तर शेराने धान्य वाटप करण्यात येते. दहा किलो धान्य इतर किराणा दुकानात मोजले तर ते आठ ते साडेआठ किलोच भरते , दुकानदार अंगठे प्रत्येक महिन्याला घेवुन जातो धान्य मात्र सरळ - सरळ काळ्या बाजारात विक्री करत असुन गोर गरीब जनतेला न जुमानता महिन्याला नाही तर तिन ते चार महिण्यातून एकदाच राशन येत असल्याचे म्हणत लोकांचे राशन चक्क गायब करत असल्याने मौजे वांगी बु. येथील ग्रामस्थांमध्ये सदरील स्वस्त धान्य दुकानदार सुखदेव गरड यांच्या विरोधात नाराजीचा सूर उमटला असुन गोर गरिब जनतेला हक्काचं राशन मिळवुन देण्यासाठी तालुका दंडाधिकारी यांनी विषेश लक्ष घालून सदरील स्वस्त धान्य दुकानदार सुखदेव मंजाजी गरड यांचा परवाना रद्द करून लवकरात लवकर दूसऱ्या एखाद्या सुज्ञ व्यक्तीकडे दुकान परवाना देवून गोर गरीब जनतेला न्याय मिळवून द्यावा व सुरळीत राशन वाटप करण्यासाठी प्रयत्न करावे अशी विनंतीवजा मागणी दिनांक १० एप्रिल रोजी समस्त गावकरी यांच्या वतीने निवेदनाव्दारे केली आहे. प्रसंगी नानाभाऊ गायकवाड , उत्तम गायकवाड , राजेभाऊ गायकवाड , विठ्ठल गरड , मंचक गरड , ज्योतीराम बारगजे , बाबुराव गरड , मदन गरड , उत्तम सोळंके , उद्धव गिरे , अनंत सत्वधर , दिनेश रासवे , बाबुराव भिसे , महानंदा गरड , धनावती भिसे , विजय रासवे , भरत गरड , विलास गरड यांची उपस्थिती होती तर शेकडो गावकऱ्यांच्या निवेदनावर सह्या आहेत.

# इंडिया आघाडीच्या पारड्यात बीडचे एक मत टाकण्यासाठी प्रयत्नशील राहणार- खा रजनीताई पाटील

## काँग्रेसच्या बैठकीत बजरंग सोनवणेंना विजयी करण्याचा निर्धार

**वादळवार्ता/बीड**

देशात सर्वधर्म समभाव हा भाव वाचवण्यासाठी इंडिया आघाडीची स्थापना करण्यात आली त्यात काँग्रेस मोठ्या भावाच्या भूमिकेत आहे देशात सत्ता मिळवायची असेल तर एक एक खासदार महत्वाचा आहे म्हणून इंडिया आघाडीच्या पारड्यात बीडचे एक मत टाकण्यासाठी काँग्रेसचा प्रत्येक कार्यकर्ता प्रयत्नशील राहील अशी स्पष्ट ग्वाही काँग्रेसच्या नेत्या खा रजनीताई पाटील यांनी दिली लोकसभेचे उमेदवार बजरंग सोनवणे यांच्या प्रचारार्थ आयोजित काँग्रेस पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या मेळाव्या प्रसंगी दिली

रजनीताई पाटील यांच्या शिवनेरी या निवासस्थानी आयोजित या बैठकीला राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्रजी पवार पक्षाचे निरीक्षक जीवनराव गोरे, माजी मंत्री अशोकराव पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्रजी पवार पक्ष.




आणि इंडिया आघाडीचे लोकसभेचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख, विधानसभा प्रमुख सुरेश तात्या पाटील, जिल्हा उपाध्यक्ष राहुल सोनवणे, माजी आमदार पृथ्वीराज साठे, महिला आघाडीच्या पांडूळेताई आदित्य दादा पाटील, पशुपतीनाथ दांगट, डॉ. नरेंद्र काळे, माजी नगराध्यक्ष कबिरोद्दिन इनामदार, दलील इनामदार, श्रीधर बाबा भवर हे उपस्थित होते. यावेळी रजनीताई पाटील पुढे बोलताना म्हणाल्या कि ; कार्यकर्त्यांनी एकदिलाने आणि एकविचाराने कमंक्रून बजरंग सोनवणे यांना निवडून आणण्यासाठी कार्यकर्त्यांनी कामाला लागावे. असे आवाहन केले. तसेच या देशात जर पुन्हा भाजपचे सरकार आले तर कदापि देशात निवडणूक होणार नाहीत. या देशाची वाटचाल हुकूमशाहीकडे होईल.

### ताईंचे आशीर्वाद माझ्यासाठी विजय प्रशस्त करणारे - बजरंग सोनवणे

रजनीताईंकडे पाच राज्यांची जबाबदारी आहे त्यातून त्यांनी वेळ काढला व येथे येऊन त्यांनी मला आशीर्वाद दिले ते माझ्यासाठी मोलाचे आहेत त्यांच्या साथीमुळे माझा विजयाचा मार्ग प्रशस्त झाला आहे .आता राजकीय विश्लेषकांसाठी कुठल्याही किंतु परंतु ला जागा नसल्याचे बजरंग सोनवणे यांनी नमूद करत ताईंचे आभार मानले तसेच भविष्यात योग्य समन्वय ठेऊनच काम करू व कुठलीही अडचण येणार नाही याची दक्षता घेऊ असे आश्वासन त्यांनी दिले

### नेत्यांनी जनतेचे मन ओळखण्यात शहाणपण - अशोक पाटील

पूर्वी नेत्याच्या खिशात जनता असायची त्यामुळे नेते सांगतील तेच ते ऐकत असत पण आता या निवडणुकीत परिस्थिती वेगळी आहे आता लोकांचे म्हणणे समजून घेण्यात हुषारी असल्याचे मत माजी मंत्री अशोक पाटील यांनी यावेळी व्यक्त केले

यावेळी जीवनराव गोरे यांनी देखील याचा सर्वांनी विचार करून पुरोगामी विचाराच्या उमेदवाराला निवडून देण्यासाठी एकत्रितपणे व समन्वय ठेवून काम करण्याची आवाहनहि त्यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना केले इंडिया आघाडीची मूठ आवळून जिल्ह्यातून बजरंग सोनवणे यांना निवडून आणण्यासाठी बूथ कमिट्याची रचना करून मतदारांना मतदान केंद्रा पर्यंत घेवून जात मतदान करून घेण्याचे नियोजन करण्याचा सल्ला दिला. या बैठकीला जिल्ह्यातील काँग्रेसचे प्रमुख कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते या बैठकीचे प्रास्ताविक राहुल सोनवणे यांनी केले तर सुत्रसंचलन प्रवीण शेप यांनी केले

**दैनिक वादळ वार्ता हे पत्र मद्रक गु राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथनू डिजिटल छापनू संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथनू त्यांच्या ऑफिस वरून बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )**